# नागरीकांची सनद

**<u>प्रस्तावना</u>**

पर्यटन हा जागतिक स्तरावर सर्वात वेगाने वाढणारा सेवा उद्योग आहे. अनेक देशांची अर्थव्यवस्था पर्यटनावर अवलंबून आहे. मोठया प्रमाणावर कुशल, अर्धकुशल व अकुशल रोजगार निर्मिती करण्याची या उद्योगाची क्षमता आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची स्थापना २० जानेवारी १९७५ रोजी झाली. महामंडळाची स्थापना कंपनी कायदा १९५६ अंतर्गत करण्यात आली आहे. सुरुवातीला महामंडळाचे ३ कोटी एवढे भाग भांडवल होते ते आज रोजी २५ कोटी आहे. महामंडळाचे प्रधान कार्यालय, मुंबई येथे असून महामंडळाचे प्रादेशिक कार्यालये औरंगाबाद, पुणे, नाशिक, रत्नागिरी, नागपूर, मुंबई या ठिकाणी आहेत. महामंडळाकडे सद्या ५५ पर्यटक निवासे आहेत. तसेच, महामंडळाचे एकूण १७ माहिती केंद्रे आहेत.

**प्रपत्र - अ**

| अ. क्र. | सेवेचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकाऱ्याचा हुद्दा | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर सेवा पुरविण्याची विहित मूदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचा हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १. | **प्रोत्साहन योजना**<br>शासन निर्णय एमटीसी २००५/प्र.क्र.१७२/पर्यटन, दि.१६.१२.२००६ या शासन निर्णयाद्वारे पर्यटन धोरण-२००६ जाहिर करण्यात आले असून या अंतर्गत विविध सवलती जाहिर करण्यात आलेल्या आहेत. या योजनेंतर्गत खाजगी उद्योजगांनी पर्यटन क्षेत्रात येऊन पर्यटन स्थळी नविन हॉटेल/रिसॉर्ट, तंबू निवास, गोल्फ कोर्स इ. प्रकल्पांचा विकास करण्याकरीता त्यांना मनोरंजन कर, मुद्रांक शुल्क, ऐषोआराम कर इ. मध्ये सवलती देण्यात आल्या आहेत. | मुख्य लेखा अधिकारी<br>दुरध्वनी नं.९१-२२-२२८४५६७८<br>९१-२२-२२०४ ४०४० | १ महिना | व्यवस्थापकीय संचालक<br>सी. डी. ओ.<br>हटमेंटस,एल.आय.सी.(योगक्षेम)बिल्डींग समोर,मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०२०.<br>दुरध्वनी नं.९१-२२- २२८४ ५६७८<br>९१-२२-२२०४ ४०४० |
| २. | **आरक्षण अभिकर्ता नोंदणी**<br>या अंतर्गत महामंडळातील निवासे आरक्षित करण्यासाठी अभिकर्त्यांची नोंदणी केली जाते व त्यांनी महामंडळाला दिलेल्या सेवेबद्दल त्यांना कमिशन दिले जाते. | वरिष्ठ व्यवस्थापक (आरक्षण)<br>दुरध्वनी नं.९१-२२- २२८४ ५६७८<br>९१-२२-२२०४ ४०४० | १ महिना | व्यवस्थापकीय संचालक<br>सी. डी. ओ.<br>हटमेंटस,एल.आय.सी.(योगक्षेम)बिल्डींग समोर,मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०२०.<br>दुरध्वनी नं.९१-२२- २२८४ ५६७८<br>९१-२२-२२०४ ४०४० |
| ३. | **निवास व न्याहारी योजना**<br>पर्यटकांना किफायतशिर पध्दतीवर स्वच्छ राहण्याची आणि निवासाची घरगुती सोय उपलब्ध होईल तसेच स्थानिक लोकांना स्वयंरोजगार निर्मिती होईल या उद्देशाने सदर योजना राबविली जाते. या योजनेंतर्गत अर्जदार/नागरीक आपल्या मालकीचे घर/बंगलो/वाडा पर्यटकांसाठी उपलब्ध करुन देऊ शकतात. | व्यवस्थापक (निवास न्याहारी)<br>दुरध्वनी नं.९१-२२- २२८४ ५६७८<br>९१-२२-२२०४ ४०४० | १ महिना | व्यवस्थापकीय संचालक<br>सी. डी. ओ.<br>हटमेंटस,एल.आय.सी.(योगक्षेम)बिल्डींग समोर,मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०२०.<br>दुरध्वनी नं.९१-२२- २२८४ ५६७८<br>९१-२२-२२०४ ४०४०. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | **महाभ्रमण योजना**<br>महाराष्ट्रात भ्रमंती करुन महाराष्ट्राच्या मातीची, संस्कृतीची व परंपरांची ओळख करुन घेता यावी म्हणून पारंपारिक पर्यटनापेक्षा वेगळी अनुभूती देणार अस काही तरी पर्यटकांना दिले पाहिजे या कल्पनेतून पुढे आलेली संकल्पना. या योजनेअंतर्गत पर्यटकांना उपलब्ध करुन देण्यात येणारी पकेजेस, सेवासुविधा खालील विषयावर आधारीत असावीत.<br>१. शेती,<br>२. निसर्ग<br>३. साहसी क्रीडा<br>४. ऐतिहासिक वारसा<br>५. कला, हस्तकला<br>६. पर्यावरण व वन<br>७. ग्रामिण जीवन शैली | व्यवस्थापक (महाभ्रमण) दुरध्वनी नं.९१-२२- २२८४ ५६७८ ९१-२२-२२०४ ४०४० | १ महिना | व्यवस्थापकीय संचालक<br>सी. डी. ओ.<br>हटमेंटस,एल.आय.सी.(योगक्षेम)बिल्डींग समोर,मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०२०.<br>दुरध्वनी नं.९१-२२- २२८४ ५६७८<br>९१-२२-२२०४ ४०४० |